# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल-*jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com*

परिपत्रक क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१९/ २४४३

दिनांक : 22 AUG 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत,
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत
व्यावसायिक संस्था

विषय : ओरिएंटेशन प्रोग्रॅम : शै.व. २०१९-२०
डीबीटी पोर्टलवरील ऑनलाईन फॉर्म संदर्भातले मार्गदर्शन

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार या विभागांतर्गतच्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत, खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यांत येते की, शै.व. २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती योजनांच्या अटी व शर्तीनुसार माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डीआयटी) यांचेकडून राज्य शासनामार्फत राबविण्यांत येणा-या सर्व शिष्यवृत्ती योजनांसाठी राज्यस्तरीय सामायीक डीबीटी पोर्टल (संकेतस्थळ : http://mahadbtmahait.gov.in) बनविण्यांत आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व व्यावसायिक व इयत्ता १२वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

डीबीटी पोर्टलवर वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्याकरिता दि. २७/०८/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा. ***ड्रॉईंग हॉल (सेमिनार हॉल), दुसरा मजला, झेवियर्स इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरिंग , एस.एल. रहेजा हॉस्पिटल समोर, माहिम (पश्चिम), मुंबई-४०००१६.*** येथे ओरिएंटेशन प्रोग्रॅम आयोजित करण्यांत आलेला आहे. सर्व संबंधीत संस्थांच्या प्रतिनिधींनी सदर कार्यक्रमास न चुकता उपस्थित रहावे.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत माहितीसाठी : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई